## नियमित फौजदारी खटला क्रमांक ११६/२०१२ मधील
## निशाणी क्रमांक ०१ खालील आदेश

अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास आले की, प्रस्तुत प्रकरणातील आरोपी क्रमांक ०१ व ०२ हे सन २०१८ पर्यंत मा. न्यायालयाचे समक्ष हजर होते. त्या कालावधीमध्ये माझे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी अभियोग पक्षाच्यावतीने पंच साक्षीदार बापु गंभीरे तसेच फिर्यादी साक्षीदार विकास वैराळ यांची साक्ष नोंदविली. त्यानंतर आरोपी गैरहजर राहिल्याने त्यांच्याविरुध्द जाहिरनामा (Proclamation) काढण्यात आला. दिनांक २१/०९/२०२२ रोजी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २९९ आन्वये पुढील कार्यवाही बाबत आदेश पारित करण्यात आला. तथापि, त्यानंतरही अभियोग पक्ष उर्वरित साक्षीदार न्यायालयाचे समोर हजर करण्यास असमर्थ ठरले.

०२. अभिलेखाचे पुन: अवलोकन केले असता, असे दिसून येते की, आरोपींविरुध्द वेळोवेळी अजामीनपात्र वॉरंट काढण्यात आले असून जाहीरनामा देखील बजावलेला आहे. तरीही, आरोपी अदयाप परागंदा असून त्यांचा ठावठिकाणा लागत नाही. त्यामुळे या न्यायालयाने अभिलेखावर नमुद असलेल्या आरोपींच्या विधिज्ञांना, आरोपींबद्दल चौकशी केली असता, त्यांनी देखील त्यांचा आरोपींशी कोणताही संपर्क नसल्याचे सांगितले. परीणामी, दिनांक २१/०२/२०२६ रोजी या न्यायालयाने अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला.

०३. अभिलेखावरील साक्षी व पुराव्यांचे मुल्यमापण केले असता, असे निदर्शनास येते की, आरोपींना प्रस्तुत गुन्हयामध्ये गुंतविण्याकरीता आवश्यक असा ठोस व विश्वासार्ह पुरावा उपलब्ध नाही. प्रस्तुतचे प्रकरण सन २०१२ पासून प्रलंबित असून त्यास १३ वर्षांपेक्षा अधिक कालावधी झालेला आहे.

०४. सदय स्थितीत आरोपींची उपस्थिती नजिकच्या काळात सुनिश्चित होण्याची शक्यता नाही. अशा परिस्थितील केवळ आरोपींच्या अनुपस्थितीमुळे

प्रकरण वारंवार प्रलंबित ठेवणे न्यायोचित ठरणार नाही. म्हणून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५६ अन्वये प्रस्तुत चे प्रकरण आरोपीच्या गैरहजेरीत पुढे चालविणे आवश्यक व न्यायोचित होईल. तसेच आरोपी अनुपस्थित असल्याने त्यांचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ नुसार निवेदन नोंदविणे शक्य नाही. अभिलेखावरील सर्व बाबींचा विचार करता, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे:–

**-: आदेश :-**

०१. आरोपींचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ नुसार निवेदन वगळण्यात येते.

०२. प्रस्तुतचे प्रकरण भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५६ अन्वये आरोपी क्रमांक ०१ व ०२ यांच्या गैरहजेरीत पुढे चालविण्यात येते.

०३. प्रस्तुतचे प्रकरण पुढील टप्प्यास लावण्यात यावे.

(निर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व जाहीर)

**सही/–**
**(अनुश्री ब. फंड)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्रमांक ०२),
**जामखेड**.

दिनांक:– ०४/०४/२०२६
ठिकाण:– जामखेड